# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट १०/२०२५ दि. ०८/०१/२०२५

# प्रेस नोट

## “ सोनाराचे दुकानामध्ये जावून ऑनलाईन पेमेंट झाल्याचे दाखवून सोनारांची फसवणूक करणाऱ्या आरोपीतास अटक करण्यात मिरारोड पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.”

तक्रारदार नामे नितु सिंग तुंडावत , वय- २४ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा सिल्वर पार्क, मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे. यांनी ते काम करीत असलेल्या साई सिध्दी ज्वेलर्स शॉप, मिरारोड पू येथील दुकानामध्ये दिनांक २४/१२/२०२४ रोजी १७.०० वा ते १७.१५ वा दरम्यान एका अनोळखी इसमाने ७ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी खरेदी करून रु. ५१,२००/- (रक्कम रु. एक्कावन हजार दोनशे फक्त) हे फिर्यादी यास ऑनलाईन ट्रान्सफर केले आहेत असे दाखवून फिर्यादीस पैसे न देता फिर्यादीची फसवणूक केली.अशी तक्रारदार त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मिरारोड पोलीस ठाणेस गु.र.क्र. ४०३/२४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८ (४) प्रमाणे अनोळखी इसमा विरूध्द दिनांक २६/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्हा हा सोनाराची फसवणूक झाली असल्याने वरिष्ठ अधिकारी यांनी नमद गुन्हयातील आरोपीताचा तात्काळ शोध घेवून अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याच्या व गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्याच्या सुचना दिल्या. मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे आरोपीताचे प्राप्त मोबाईल क्रमांकाचा तपशील प्राप्त केला व सदर तपशीलाचे आधारे तांत्रिक विश्लेषण व जवळपास २०० सि.सी.टी.व्ही. फुटेजच्या मदतीने आरोपीत हा निष्पन्न केला. सदर आरोपीत हा गुन्हा घडल्यापासुन स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत होता. सदर आरोपीत नामे रचित राजकुमार रांका, वय २५ वर्षे, व्यवसाय- अकाऊंट फ्रिलान्सर, रा- अजमेर, राजस्थान यास नमद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपीताकडून या पोलीस ठाणे व्यतिरीक्त दिंडोशी पोलीस ठाणेचा गुन्हा देखील उघडकीस आलेला आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम | चोरीस गैलेली मालमत्ता |
|---|---|---|---|
| १. | मिरारोड पोलीस ठाणे | ४०३/२४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८ (४) प्रमाणे | रु. ५१,२००/- किं. ७ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जु.वा. |
| २. | दिंडोशी पोलीस ठाणे मुंबई | ०८/२०२५ कलम ३१८ (४) भारतीय न्याय संहिता २०२३ | रु. २५,१००/- किं. ३ ग्रॅम वजनाची सोन्याची रिंग जु.वा. |

आरोपीताचे तपासामध्ये गुन्हयातील १०० टक्के मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्ह्याचे तपासी अधिकारी सपोनि प्रविण भोसले हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, मिरारोड, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, मेघना बुरांडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मिरारोड पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस  स्टेशनचे सपोनि प्रविण भोसले, सपोनि संतोष सांगवीकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.ह. ०६२६७/गिरमे, पो.ह. ०७१५१/तेरवे, पो.ह. १००३९/हरणे, पो.शि. १५०१२/शेळके, पो.शि. २२०५३/देवरे, पो.शि. २२०६३/दासरे व तांत्रिक मदत पो.ह. ०००२०/जाधव (मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ कार्यालय) अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.



**------------00000--------------**